# स्वच्छतेचे महत्व पटवून देणे गरजेचे : लाड

दै. केसरी 19/1/2020




**मोहिते वडगाव येथे क्रांतीअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना क्रांतीचे प्रमुख अरुण लाड व उपस्थित मान्यवर.**

**कुंडल : वार्ताहर**

स्वच्छता करतानाच स्वच्छतेची सवय लोकांना लावण्याचे काम विद्यार्थ्यांनी केले पाहिजे. स्वच्छता ठेवली तर आपले आरोग्य चांगले राहील याकरीता विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून लोकांनाही स्वच्छतेचे महत्व पटवून देणे गरजेचे असल्याचे मत, क्रांती उद्योगसमुहाचे प्रमुख अरुणअण्णा लाड यांनी केले. ते मोहिते वडगाव (ता. कडेगाव) येथे क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रिय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबाराच्या उद्घाटन समारंभप्रसंगी बोलत होते. यावेळी सरपंच विजय मोहिते प्र. प्राचार्य डॉ. प्रताप लाड आदी उपस्थित होते.

अरुण अण्णा पुढे म्हणाले, मुलांनी वेळ वाया न घालवता अभ्यास करुन आपले करीअर घडविण्याकडे लक्ष द्यावे. राष्ट्रीय सेवा योजनेतून समाजसेवेचा वसा मिळतो तो समर्थपणे चालवला तर जिवानाचे उद्देश सफल होईल.

विजय मोहिते म्हणाले, कुंडल महाविद्यालयाचे व गावाचे रुणानुबंध असुन आम्ही दरवर्षी यांची वाट पाहत असतो. आलेल्या विद्यार्थ्यांचे पालकत्व आम्ही घेतो. तुमच्याही हातून चांगले काम होईल.

प्रारंभी स्वागत प्र.प्राचार्य डा. प्रताप लाड यांनी केले. यावेळी सुदाम मोहिते, दत्तात्रय मोहिते, कृष्णाचे संचालक पांडूरंग मोहिते, सर्जेराव मोहिते, विकास मोहिते, शिवाजी मोहिते, सचिन मोहिते, संतोष कुंभार, वैशाली मोहिते, धनश्री कुंभार, यास्मिन शिकलगार, निता लादे आदिसह राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक, ग्रामस्थ विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

↑ दै. केसरी 19/01/2020

---

# चांगल्या आरोग्यासाठी स्वच्छता आवश्यक : लाड




**कुंडल : मोहिते वडगाव येथे क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलताना अरुण लाड व अन्य.**

← दै तरुण भारत 19/01/2020

दै. तरुण भारत 19/1/2020

वार्ताहर कुंडल

स्वच्छता करतानाच स्वच्छतेची सवय लोकांना लावण्याचे काम विद्यार्थ्यांनी केले पाहिजे. स्वच्छता ठेवली तर आपले आरोग्य चांगले राहिल याकरीता विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून लोकांनाही स्वच्छतेचे महत्व पटवून देणे गरजेचे असल्याचे मत क्रांती उद्योगसमुहाचे प्रमुख अरुण अण्णा लाड यांनी केले ते मोहिते वडगाव (ता. कडेगाव) येथे क्रांतिअग्रणी जी.डी. बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबाराच्या उद्घाटन समारंभप्रसंगी बोलत होते. यावेळी सरपंच विजय मोहिते प्र.प्राचार्य प्रताप लाड आदी उपस्थित होते.

अरुण अण्णा पुढे म्हणाले, मुलांनी वेळ वाया न घालवता अभ्यास करुन आपले करीअर घडविण्याकडे लक्ष द्यावे. राष्ट्रीय सेवा योजनेतून, समाजसेवेचा वसा मिळतो तो समर्थपणे चालवला तर जिवानाचे उद्देश सफल होईल.

विजय मोहिते म्हणाले, कुंडल महाविद्यालयाचे व गावाचे ऋणानुबंध असुन आम्ही दरवर्षी यांची वाट पाहत असतो. आलेल्या विद्यार्थ्यांचे पालकत्व आम्ही घेतो तुमच्याही हातून चांगले काम होईल.

प्रारंभी स्वागत प्र.प्राचार्य प्रताप लाड यांनी केले. यावेळी सुदाम मोहिते दत्तात्रय मोहिते कृष्णाचे संचालक पांडूरंग मोहिते सर्जेराव मोहिते विकास मोहिते, शिवाजी मोहिते, सचिन मोहिते, संतोष कुंभार, सौ. वैशाली मोहिते, धनश्री कुंभार, यास्मिन शिकलगार निता लादे आदीसह राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक उपस्थित होते.



मोहिते वडगाव (ता. कडेगाव) येथे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिरात बोलताना जिल्हा बँकेचे संचालक किरण लाड.

# एनएसएसमधून विद्यार्थ्यांना स्वच्छतेबरोबरच ग्रामीण संस्कृतीशी ओळख : किरण लाड

कुंडल : वार्ताहर

विद्यार्थ्यांना स्वच्छतेबरोबरच ग्रामीण भागातील संस्कृती समजून घेण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना ही चांगली संधी असते. त्याकरिता जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी एन.एस.एस. मध्ये सहभागी होणे आवश्यक आहे, असे मत जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक किरण लाड यांनी व्यक्त केले.

ते मोहिते वडगाव (ता. कडेगाव) येथे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप समारंभप्रसंगी बोलत होते. यावेळी सरपंच विजय मोहिते, प्र. प्राचार्य डॉ. प्रताप लाड आदी उपस्थित होते.

किरण लाड पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांचे गणित व नागरिकशास्त्र चांगले असेल तर तो देशाचा आदर्श नागरिक बनू शकतो. यावेळी सुदाम मोहिते, विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी बोलताना विजय मोहिते म्हणाले, व्यवस्थित होण्यासाठी दोन पक्के नवे पेयजलाची टाकी असावी लागते, हे समजून महाविद्यालयाने या शिबिरासाठी या गावची निवड केल्याबद्दल त्यांनी गावच्या वतीने आभार मानले.

प्रास्ताविक स्वागत प्र. प्राचार्य डॉ. प्रताप लाड यांनी केले. यावेळी सुदाम मोहिते, ज्ञानदेव मोहिते, कृष्णाचे संचालक पांडुरंग मोहिते, सर्जेराव मोहिते, हणमंत मोहिते, विकास मोहिते, शिवाजी मोहिते, सु. द. मोहिते, सचिन मोहिते, संतोष कुंभार, अनिल लाड, वसंत नार, सचिन पाटील, शंकर मोहिते, वैशाली मोहिते, धनाजी कुंभार, यास्मिन शिकलगार, नीता लाड आदींसह राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, ग्रामस्थ, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

दै. केसरी - 25/09/2020

# एन.एस.एस.मधून विद्यार्थ्यांना संस्कृती समजून घेता ये

## किरण लाड : क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिवि

वार्ताहर
कुंडल

विद्यार्थ्यांना स्वच्छतेबरोबरच ग्रामीण भागातील संस्कृती समजून घेण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना ही चांगली संधी असते त्याकरीता जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी एन.एस.एस. मध्ये सहभागी होणे आवश्यक असल्याचे मत जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक किरण लाड यांनी केले ते मोहिते वडगाव (ता. कडेगाव) येथे क्रांतिअग्रणी जी.डी. बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या समारोप समारंभप्रसंगी बोलत होते. यावेळी सरपंच विजय मोहिते प्र.प्राचार्य प्रताप लाड आदी उपस्थित होते.



**कुंडल : राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप प्रसंगी बोलताना जिल्हा बँकेचे संचालक किरण लाड व उपस्थित मान्यवर**

किरण लाड पुढे म्हणाले, विद्यार्थ्यांचे गणित व नागरीकशास्त्र चांगले असेल तर तो देशाचा आदर्श नागरिक बनू शकतो. याप्रसंगी सुदाम मोहिते, विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. विजय मोहिते म्हणाले यशस्वी होण्यासाठी दोन पाऊले मागे येण्याची तयारी असावी लागते. हे सांगून महाविद्यालयाने या शिबिरासाठी या गावाची निवड केल्याबद्दल त्यांनी गावाच्या वतीने आभार मानले.

यावेळी सुदाम मोहिते, दत्तात्रय मोहिते, पांडूरंग मोहिते, सर्जेराव मोहिते, हणमंत मोहिते, विकास मोहिते, शिवाजी मोहिते, सु.द.मोहिते, सचिन मोहिते, संतोष कुंभार, अनिल लाड, वसंत मोरे, सचिन पाटील, शंकर मोहिते, सौ.वैशाली मोहिते, सौ.धनश्री कुंभार, सौ.यास्मिन शिकलगार, सौ.निता लादे उपस्थित होते.

दै. तरुण भारत - ता- 24/09/2020

# राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात सहभागी व्हा

## किरण लाड; मोहिते वडगाव येथे क्रांतीचे श्रमसंस्कार शिबिर

वांगी, ता. २४ : विद्यार्थ्यांना स्वच्छतेबरोबरच ग्रामीण भागातील संस्कृती समजून घेण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना ही चांगली संधी असते त्याकरिता जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी एन. एस. एसमध्ये सहभागी होणे आवश्यक असल्याचे मत जिल्हा बँकेचे संचालक किरण लाड यांनी केले.

मोहिते वडगाव (ता. कडेगाव) येथे क्रांती महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोप समारंभप्रसंगी बोलत होते. त्यावेळी सरपंच विजय मोहिते प्र. प्राचार्य डॉ. प्रताप लाड आदी उपस्थित होते.



**मोहिते वडगाव : येथे क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या विशेष श्रमसंस्कार शिबिर समारोपप्रसंगी बोलताना जिल्हा बँकेचे संचालक किरण लाड व उपस्थित मान्यवर.**

किरण लाड म्हणाले, "विद्यार्थ्यांचे गणित व नागरिकशास्त्र चांगले असेल तर तो देशाचा आदर्श नागरिक बनू शकतो. महाविद्यालयीन जीवनात श्रमाची सवय लागली. तर तो आयुष्यात कुठल्याही बाबतीत कमी पडत याचा विचार होऊनच विद्यापीठांनी राष्ट्रीय सेवा योजनेची निर्मिती केली. विशेष श्रमसंस्कार शिबिरातून त्यास व्यापक स्वरूप दिले. ही सेवा अंगीकारणे सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी गरजेचे आहे. प्रारंभी प्र. प्राचार्य डॉ. प्रताप लाड यांनी स्वागत केले. यावेळी सुदाम मोहिते, दत्तात्रय मोहिते, कृष्णाचे संचालक पांडुरंग मोहिते, सर्जेराव मोहिते, हणमंत मोहिते, विकास मोहिते, शिवाजी मोहिते, सु. धो. मोहिते, सचिन मोहिते, संतोष कुंभार, अनिल लाड, वसंत मोरे, सचिन पाटील, शंकर मोहिते, वैशाली मोहिते, धनश्री कुंभार, यास्मिन शिकलगार, नीता लादे उपस्थित होते.

दै. सकाळ
25/09/2020